# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ३०/०८/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. १६/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. १६/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणें आले.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| २ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या मोफत पास योजने करीता वाढीव तरतुदीस मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांना मोफक पास योजना हा उपक्रम चांगला असून विद्यार्थी व पालक यांच्या दृष्टीने योग्य आहे. मनपा रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार तथा पोषण व आरोग्य भत्ता या लेखा शिर्षकातुन विद्यार्थ्यांना मोफत बस पास योजना या लेखा शिर्षकास १,०१,७१,५३९/- रक्कम रु. निधी वर्ग करण्यांत यावा. तसेच चालू वर्षात अतिरीक्त निधीची आवश्यकता भासल्यास मनपा रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार तथा पोषण व आरोग्य भत्ता या ह्याच लेखाशिर्षामधून आवश्यक असलेली रक्कम वेळोवेळी खर्च करण्यास आजची सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती 'सी' क्षेत्रातील विविध रस्त्यांवर आवश्यकतेनुसार पट्टे मारणेकामी तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजरपत्रकीय रक्कम (रु.७०,६२,११४/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ४ | हायड्रॉलिक जॅक पुशिंग पद्धतीने विरार कारशेड जवळ रेल्वे ट्रॅकच्या खालुन १७०० मी.मी. व्यासाची व नारिंगी फाटक येथे १७०० एमएस व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठी प्रकल्प सल्लागार नेमणे (PMC) कामी मागविलेल्या दरपत्रके / कोटेशननुसार मे. योलेक्स इन्फ्राएनर्जी | **ठराव :-** वर नमुद केलेल्या प्रस्तावानुसार कोटेशनधारक मे. योलेक्स इन्फ्राएनर्जी प्रा.लि यांनी हायड्रॉलिक जॅक पुशिंग पद्धतीने विरार कारशेड जवळ रेल्वे ट्रॅकच्या खालुन १७०० मी.मी. व्यासाची व नारिंगी फाटक येथे १७०० एमएस व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठी मी.मी. व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठी अंतिमरीत्या कमी करून दिलेले दर एकत्रित ठोक रक्कम रु. ६९,३०,०००/- चे कोटेशन मंजूर करणेंस तसेच मुंबई प्रांतिक महानगरापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार करारनामा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |

| | | |
|---|---|---|
| | प्रा.लि. यांचे कमी दराचे दरपत्रक/कोटेशन मंजुर करणेबाबत. | |
| ५ | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा अंतर्गत २४० लिटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins with lid मागविणे कामाची मे. निलकमल लि. यांची कमी दराची निविदा मंजुर करणेबाबत. | **ठराव :-** वर नमुद प्रस्तावावर खालील प्रमाणे मान्यत देण्यांत येत आहे. १) निविदाधारक मे. निलकमल लि.यांनी अंतिमरीत्या कमी करून दिलेले दर रू. ३६००/- (प्रति नगास) मंजूर करणेस तसेच सादर केलेल्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४८ चे कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. २) केंद्र शासनाच्या पायाभूत सुविधा पुरविणेची योजना UIDSST अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन योजनेतील २४० लिटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins या बाबींसाठी मंजूर रक्कम र. ५,४२,९०,०००/- मधून बिन्सची खरेदी झाल्यानंतर निधी शिल्लक राहिल्यास वाढीव बिन्स मंजूर दराने वर नमुद ठेकेदार मे.निलकमल लि. यांचेकडून त्याच दराने खरेदी करणेचे अधिकार मा.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देणेंत येत आहेत. ३) निविदेतील अटी-शर्तीनुसार संविदा करणेंस ही स्थायी समिती सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ६ | विरार पू. प्रभाग क्र. १६ मध्ये LC ४० ते विरार मोटर्स पर्यंत चेकर्ड टाईल्स बसविणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता श्री.बी.जी. भास्करे ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा (-) ८.५०% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर मान्यतेसाठी ठेवणेंस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. समीर डबरे** |
| ७ | विरार पू. महापालिका कार्यालयाशेजारील जुने ओले व सुके मच्छिमार्केट तोडण्याबाबत कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे.अस्मि एन्टरप्रायझेस ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा ४.९८% जास्त दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| ८ | विरार प. प्रभाग क्र. ७ मध्ये शिरलय चर्च ते उंबरगोठण पर्यंत पाईप गटार बनविणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. शायोना कॉर्पोरेशन ह्यांची निविदा ४.९०% जास्त दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे व याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील** |
| ९ | विरार प. प्रभाग क्र. ८ मध्ये धोबीतलाव येथे समाज मंदिर बांधणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. महावीर एंटरप्रायजेस ह्यांची निविदा २.४९% जास्त दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे व याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर |

| | | |
|---|---|---|
| | करणेस मान्यता देणेबाबत. | बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| १० | प्रभाग समिती क, वॉर्ड नं. ३६ मध्ये सिद्धीविनायक नगर येथे आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी मंजुर निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची मे. शाहरूख खान यांची २.९९% जास्त दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मे.शाहरूख खान यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| ११ | सन २०१६/१७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दितील भटक्या / जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे कामी आलेल्या ई निविदेमधील कमी दराची निविदा मंजुरीबाबत. | **ठराव :-** सन २०१६/१७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील भटक्या/जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणेकामी आलेल्या निविदेमधील ॲनिमल फ्रेंडस् वेल्फेअर पब्लिक सोसायटी, ठाणे यांची नर कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे कामी रू. १,०००/- व मादी कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे रॅबीज प्रतिबंधक लस देणे कामी रू. रू. १,१००/- वाटाघाटीअंती आलेले प्रति श्वान दर ही सभा मंजूर करीत आहे. ॲनिमल फ्रेंडस् वेल्फेअर पब्लिक सोसायटी, ठाणे यांसकडून मंजूर दराने भटक्या/जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबीज प्रतिबंधक लस देणे काम करून घेण्यात यावे. भटक्या / जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया केल्यानंतर वेळोवेळी येणारी बील अदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| १२ | वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महानगरपालिका सभा तसेच इतर कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार चहापान, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार इत्यादी व्यवस्था करणे व फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी प्राप्त ई- निविदांमधील कमी व योग्य दरांच्या निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** वरील प्राप्त ई-निविदा दरांची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे उल्लेख केलेल्या निविदाकारांचा समोर नमुद केलेले घटकांचे दर तुलनात्मक कमी आहेत. परंतु घटक २ (८) मधील दर जास्त असल्याने बाजारभावानुसार दर कमी करून घेण्यांत यावा. **प्रिती एंटरप्रायजेस** :- घटक क. ३७, ३८. **सामकीमाता इंटरप्रायझेस** :- घटक क्र. २ (१,३ ते ७,१०), ३ (४), १६ ते ३२,३५ ( १ ते ४) ३६, (१ ते ८). **शार्वी कॅटरर्स :-** घटक क्र १ (८ ते १०,१४), ८,१२ ते १५. श्री **अनिरूध्दाय इंम्प्रेशन :-** घटक क्र.१ (१ ते ७,११ ते १३,१५ ते २९), २ (२,८,९), ३ ( १ ते ३,५,६), ४ ते ७,९ ते ११,३३ (१,२),३४ प्राप्त तुलनात्मक कमी दर योग्य व बाजवी आहेत. सदरच्या ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीस शिफारस केली आहे. तरी सदर तुलनात्मक कमी दराच्या ई-निविदाकारांबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| १३ | वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात | **ठराव :-** वरील प्राप्त ई-निविदा दरांची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे उल्लेख केलेल्या निविदाकारांचा समोर नमुद केलेले घटकांचे दर तुलनात्मक कमी आहेत. **सामकीमाता इंटरप्रायझेस** :- घटक क्र. १५. **सेवालाल इंटरप्रायझेस :-** घटक क्र. |

| | | |
|---|---|---|
| | सार्वजनिक कार्यक्रम, शालेय कला - क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महिला मेळावे व इत्यादी कार्यक्रमासाठी स्टेज मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम इत्यादी व्यवस्था भाड्याने पुरवठा करणेकामी प्राप्त ई- निविदांमधील कमी व योग्य दरांच्या निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता देणे. | १,२,४ ते ८,१८,३३,४४,४७ ते ५१,५६ (१ ते ११), ५७ ते ५९,६२,६३,६५. **गजानन मंडप डेकोरेटर्स :-** घटक क्र. ९ ते १४,१६,१७,१९,२१,२३,३४ ते ४०,४२,४३,४५,४६,५५,६०,६१. **सिराज मंडप डेकोरेटर्स** :- घटक क्र.३,२०,२२,२४ ते ३२,४१,५२ ते ५४,६४ प्राप्त तुलनात्मक कमी दर योग्य व वाजवी आहेत. सदरच्या ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीस शिफारस केली आहे. तरी सदर तुलनात्मक कमी दराच्या ई-निविदाकारांबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |